# वैद्यकीय प्राणवायूची गरज निम्म्याने घटली

**पुणे, दि. २१, (प्रतिनिधी)** : कोरोनाबाधितांची संख्या घटली असल्याने सध्या वैद्यकीय प्राणवायूची गरज निम्म्याने घटली आहे. यापूर्वी कोरोनाबाधितांपैकी पाच ते सहा टक्के रुग्णांनाच प्राणवायूची गरज असताना १५ टक्के रुग्णांना प्राणवायू देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले होते. आल्यानंतर राज्याच्या आरोग्य विभागाने खासगी रुग्णालयांमधील प्राणवायू वापराचे लेखापरीक्षण करण्याचे आदेश दिले होते. मात्र, सध्या प्राणवायूचा वापर कमी झाल्याने त्याबाबत लेखापरीक्षणच केले नसल्याचे समोर आले आहे.

रुग्णांच्या तुलनेत प्राणवायूचा वापर अधिक असल्याचे निदर्शनास आल्यानंतर खासगी रुग्णालयांमधील प्राणवायूच्या वापराची पडताळणी करणे, भरणा केंद्रांवर देखरेख ठेवण्याचे आणि सर्व रुग्णालयांना प्रतिदिन किती प्राणवायूची गरज आहे याची माहिती संकलित करण्याच्या सूचना गेल्या महिन्यात देण्यात आल्या होत्या. एक महिन्यानंतरही लेखापरीक्षण करण्यात आले की नाही, याबाबत प्रशासनाकडून माहिती दिली जात नसल्याचे समोर आले आहे.

अन्न व औषध प्रशासन पुणे विभागाचे उपआयुक्त एस. बी. पाटील म्हणाले, की पुणे जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात आरोग्य विभागाकडून २३० मेट्रिक टन प्राणवायूची मागणी होती. त्यानुसार पुरवठा करण्यात आला, मात्र प्रत्यक्षात केवळ १६० मे. टन प्राणवायूचा वापर झाला. परिणामी उर्वरित प्राणवायूचा साठा शिल्लक राहिला. ऑक्टोबर महिन्यातही ही मागणी निम्म्याने कमी झाली आहे. मात्र, अचानक रुग्णसंख्या वाढल्यास अतिरिक्त साठा प्रत्येक शासकीय आणि खासगी रुग्णालयांना देऊ केला आहे, तरीदेखील प्राणवायू शिल्लक राहत असल्याचे दिसून येत आहे.

### वैद्यकीय गरज भागवून उद्योगांना प्राणवायू

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात प्राणवायूच्या एकूण उत्पादनापैकी ८० टक्के प्राणवायू वैद्यकीय वापरासाठी, तर २० टक्के औद्योगिक वापरासाठी निश्चित करण्यात आला होता. मात्र, सप्टेंबरअखेरपासून शहरासह जिल्ह्यातील कोरोनाबाधितांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. परिणामी वैद्यकीय प्राणवायूची मागणी ४० ते ५० टक्क्यांनी कमी झाली आहे. दुसऱ्या बाजूला उद्योगचक्र सुरू झाले असून प्राणवायू सुरळित नसल्याने अनेक उद्योगांना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने वैद्यकीय प्राणवायूची गरज भागवून उर्वरित प्राणवायूचा पुरवठा उद्योगांना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# उपवासासाठी भेंडी, बटाटा, राजगिऱ्याला मागणी

**पुणे, दि. २१, (प्रतिनिधी)** : नवरात्रोत्सवात अनेक जण भक्तिभावाने उपवास करतात. उपवासासाठी लागणाऱ्या भाज्यांच्या विशेषतः भेंडी, बटाटा, राजगिऱ्याच्या मागणीत वाढ झाली आहे. राजगिऱ्याची गड्डी स्वस्त असली, तरी भेंडी आणि बटाट्याच्या दरात वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात एक किलो भेंडीची १२० ते १४० रुपये किलो या दराने विक्री केली जात आहे. गेल्या महिनाभरापासून बटाट्याचे दर तेजीत असून बटाट्याची विक्री ६० रुपये किलो या दराने केली जात आहे.

नवरात्रोत्सवात रताळ्यांची मुबलक आवक होत आहे. किरकोळ बाजारात एक किलो रताळ्यांची प्रतवारीनुसार ६० ते ८० रुपये दराने विक्री केली जात आहे. राजगिऱ्याच्या एका गड्डीची विक्री १२ ते १५ रुपये दराने केली जात आहे. पावसामुळे बहुतांश फळभाज्यांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे फळभाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. नवरात्रोत्सवात उपवासासाठी भेंडी, राजागिरा, बटाटा, रताळी या भाज्यांना मोठी मागणी असते. गेल्या महिनाभरापासून घाऊक आणि किरकोळ बाजारात बटाट्याची आवक कमी होत चालली आहे. त्यामुळे बटाट्यांच्या दरात तेजी निर्माण झाली आहे, अशी माहिती किरकोळ बाजारातील भाजीपाला व्यापारी प्रकाश ढमढेरे यांनी दिली. नवरात्रोत्सवात मार्केट यार्डातील तरकारी विभागात रताळ्यांची आवक वाढली आहे.

सांगली जिल्ह्यातील कराड, मलकापूर, कर्नाटकातील बेळगाव भागातून सध्या रताळ्याची आवक सुरू आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा रताळ्यांना भाव कमी मिळाले आहेत. नवरात्रोत्सवात अनेकांकडून उपवास केला जातो. उपवासासाठी रताळ्यांना मागणी असते. यंदाच्या वर्षी अधिक मास असल्याने नवरात्रोत्सव एक महिना उशिरा सुरू झाला आहे. अधिक मासापासून रताळ्यांची आवक सुरू झाली आहे. कराड, मलकापूर भागातील रताळी चवीने गोड, आकाराने लहान असतात. त्यामुळे कराड भागातील रताळ्यांना मागणी असते. बेळगावमधील रताळी थोडी तुरट असल्याने मागणी कमी असते, अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड अडते संघटनेचे उपाध्यक्ष अमोल घुले यांनी दिली.

घाऊक बाजारात कराड, मलकापूर भागातील रताळ्यांना प्रतिकिलो २० ते २५ रुपये असा भाव मिळाला आहे. बेळगावमधील रताळ्यांना प्रतिकिलो १२ ते १५ रुपये भाव मिळाला आहे. कराड, मलकापूर भागातून दोन हजार गोणी तसेच बेळगाव भागातून दोन टेम्पोमधून रताळ्याची आवक झाली, असे घुले यांनी सांगितले.

# पुण्याला पुन्हा पावसाने झोडपले; पुढच्या दोन दिवसांसाठी 'हा' आहे इशारा

**पुणे, दि. २१, (प्रतिनिधी)** : दिवसभर विश्रांती घेतलेला पाऊस मंगळवारी रात्री धुवाँधार बरसला. रात्री दहा नंतर पुणे शहराच्या विविध भागात ढगांच्या गडगडाटासह आणि विजांच्या कडकडाटात जोरदार पाऊस पडला. त्यामुळे शहरात ठिकठिकाणी पाणी साठले होते. रात्रीच्या निरव शांततेत घराबाहेर कोसळणारा पाऊस, ढगांचा गडगडाट आणि विजांच्या चमकण्याने नागरिक धास्तावले. पावसाचा जोर पाहून अनेकांना गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाची रात्र आठवून धडकी भरली. हडपसर, कोंढवा, कात्रज मध्ये पावलाला पहिल्यांदा सुरुवात झाली आणि अर्ध्या तासात शहराच्या सर्वच भागात जोराचा पाऊस पडला. मुख्य रस्त्यांबरोबरच उपनगरातील गल्ल्यांमध्ये रस्त्याच्या कडेला पाणी साठले होते. रात्री उशिरापर्यंत सरी बरसत राहिल्या. परतीचा पाऊस, ऑक्टोबर हिटच्या प्रतीक्षेत असलेल्या पुणेकरांना ऑक्टोबरच्या पावसाने धडकी भरवली आहे. शहरालगतच्या घाट माथ्यावर आणि जिल्ह्यातही मुसळधार पावसाने हजेरी लावली. पुढील दोन दिवस शहरात मेघगर्जनेसह मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा तर घाट माथ्यावर जोरदार पाऊस पडणार असल्याचा इशारा भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. दरम्यान, पुण्यात गेल्या एका तासात ४३.२ मि.मी. पाऊस झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

# पूर्ण क्षमतेने भरलेल्या धरणांतील पाण्याचे नियोजन लवकरच

**पुणे, दि. २१, (प्रतिनिधी)** : खडकवासला धरणसाखळी प्रकल्पात पावसाने उघडीप दिली आहे. त्यामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीत सुरू असलेला पाण्याचा विसर्ग तूर्त थांबवण्यात आला आहे. दरम्यान, ऑक्टोबरअखेर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात धरणांमधील उपलब्ध पाण्याचे नियोजन कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात येणार आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला ही चारही धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली आहेत. सध्या चारही धरणांत मिळून एकूण २९.१३ अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजेच ९९.९४ टक्के पाणीसाठा आहे. सोमवारी रात्रभर केवळ खडकवासला धरण परिसरात २० मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली, तर उर्वरित तिन्ही धरणांच्या क्षेत्रात पावसाने विश्रांती घेतली. दिवसभरात चारही धरणांच्या परिसरात पावसाने विश्रांती घेतली. परिणामी खडकवासला धरणातून मुठा नदीपात्रात सुरू असलेला पाण्याचा विसर्ग तूर्त थांबवण्यात आला आहे. धरणांमध्ये उपलब्ध

असलेल्या पाण्याचे नियोजन ऑक्टोबर महिनाअखेर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात येणार आहे.

याबाबत खडकवासला पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता विजय पाटील म्हणाले, ह्यसध्या परतीचा जोरदार पाऊस पडत आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही पाऊस पडत आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत जिल्ह्यातील सर्व धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा आहे. धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन ऑक्टोबरअखेर होणाऱ्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात येणार आहे.

### शहराच्या वाढीव पाण्याबाबत चर्चा

पुणे महापालिकेची १७ टीएमसी पाण्याची मागणी असून ती मंजूर करण्याबाबत महापालिका आग्रही आहे. मात्र, जलसंपदा विभागाने लोकसंख्येचे प्रमाणीकरण करून देण्याचा आग्रह धरला आहे. पुण्याला ११.५० टीएमसी म्हणजेच दररोज ८९२ दशलक्ष घनफूट (एमएलडी) पाणी कोटा मंजूर आहे. राज्य सरकारकडून जास्त पाणीकोटा मंजूर होईपर्यंत वर्षाला ११.५० टीएमसी याप्रमाणेच करार करण्यास महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.

### दहा धरणांमधून पाण्याचा विसर्ग

जिल्ह्यातील केवळ पिंपळगाव जोगे आणि माणिकडोह या दोन धरणांचा अपवाद वगळता अन्य सर्व धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली आहेत. त्यामुळे सध्या दहा धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. जिल्ह्याच्या नऊ धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने जिल्ह्याच्या सीमेवरील उजनी धरणातून भीमा नदीत ३० हजार क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

नमुना क्र.७५ **सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**बृहन्मुंबई विभाग मुंबई**
धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला,
८३ डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई-४०००१८

**चौकशीची जाहीर नोटीस**

**अर्ज क्रमांक : ACC/ X / 1076 / 2020**
**सार्वजनिक न्यासाचे नाव :**
**JIYA FOUNDATION ... बाबत.**
**Mr. Rajhans Manik Gajare अर्जदार.**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, **सहायक धर्मादाय आयुक्त-१०, बृहन्मुंबई विभाग, मुंबई** हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) : रोख रु. १०००/-**
**(अक्षरी रुपये एक हजार केवळ)**
**ब) स्थावर मिळकत (वर्णन) : निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २०/१०/२०२० रोजी दिली.

**सही/-**
**अधीक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**

शिक्का

# पुण्यात कोरोनाचे ३२८ नवे रुग्ण, पिंपरीत ११ जणांचा मृत्यू



**पुणे, दि. २१, (प्रतिनिधी)** : पुणे शहरात दिवसभरात नव्याने ३२८ रुग्ण आढळल्याने १ लाख ५७ हजार ९५९ एवढी रुग्ण संख्या झाली आहे. तर दिवसभरात २१ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे अखेर ४ हजार २२ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. कोरोनावर उपचार घेणाऱ्या ९०४ रुग्णांची तब्येत ठणठणीत असल्याने, त्या सर्वांना घरी सोडण्यात आले आहे. त्यामुळे अखेर १ लाख ४५ हजार ३३६ रुग्ण कोरोनामुक्त झाले असल्याची माहिती पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागा मार्फत देण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात आज दिवसभरात २०१ करोना बाधित रुग्णांची नोंद झाली असून ११ जणांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर, ३३४ जण करोनामुक्त झाले असून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील बाधित रुग्णांची एकूण संख्या ८५ हजार ८५० वर पोहचली असून पैकी ८२ हजार ११८ जण कोरोनातून बरे झाले आहेत. महानगर पालिकेच्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सक्रिय रुग्णांची संख्या १ हजार ४६१ एवढी आहे अशी माहिती महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाने दिली आहे.

रोजच वाचा
दैनिक मुंबई लक्षदीप

## जाहीर नोटीस

मी अनिता जगदीश म्हात्रे, जाहीर करीत आहे की, माझा पती जगदीश कृष्णा म्हात्रे यांचा दिनांक 21.06.2020 रोजी मयत झाले, त्यांच्या नावे रिक्षा क्रमांक MH02-DU-2253, परमिट क्रमांक 45040/W/05 आहे. त्यांची वारस मी आहे. जर कोणास हरकत असेल तर 15 दिवसाचे आत आरटीओ अंधेरी येथे संपर्क करावा.

# रात्री अकरापर्यंत परीक्षा..

**पुणे, दि. २१, (प्रतिनिधी)** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या ऑनलाइन परीक्षेत मंगळवारी पुन्हा सर्व्हरची अडचण उद्भवली. त्यामुळे काही काळासाठी परीक्षा थांबवावी लागली. या अडचणीवर उपाय म्हणून विद्यापीठाकडून रात्री अकरापर्यंत परीक्षा देण्याची मुभा विद्यार्थ्यांना देण्यात आली. मात्र, सातत्याने येणाऱ्या तांत्रिक अडचणी सुटणार कधी, असा प्रश्न विद्यार्थी विचारत आहेत. विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ऑनलाइन परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या एकूण १ लाख ७० हजार ९०९ विद्यार्थ्यांपैकी सायंकाळी सहा वाजेपर्यंत १ लाख ५४ हजार ६३४ विद्यार्थ्यांनी मंगळवारी ऑनलाइन परीक्षा दिली. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले की, मंगळवारी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे एक लाख ७० हजारांच्या दरम्यान होती. सकाळी ६६ हजार विद्यार्थ्यांनी एकाचवेळी लॉगइन केल्याने सर्व्हरची तांत्रिक अडचण झाली. त्यामुळे विद्यार्थी संख्या अधिक असणाऱ्या विषयांची परीक्षा पुढील सत्रात घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तांत्रिक समस्यांमुळे परीक्षा देण्यात अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांना रात्री उशिरापर्यंत परीक्षा देण्याची संधी उपलब्ध केली. अभियांत्रिकीच्या पीडीडी विषयाच्या परीक्षांत निम्म्याहून अधिक प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचे असल्याने प्रश्नपत्रिका सोडवता आली नसल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. मात्र अनुत्तीर्ण होण्याच्या भीतीने घाईने प्रश्न सोडून प्रश्नपत्रिका सबमिट केल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. तांत्रिक अडचणींसहअभ्यासक्रमाबाहेरील प्रश्नांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत आहे.

# 'मिसिंग'च्या तक्रारींचा तपासही बेपत्ता

**पुणे, दि. २१, (प्रतिनिधी)** : पुण्यात बेपत्ता झालेल्या (मिसिंग) व्यक्तींचे खून झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. तरीही 'मिसिंग'ची तक्रार दाखल झाल्यानंतर तत्काळ त्याचा गांभीर्याने तपास होत नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. 'मिसिंग'च्या तक्रारींचा तपासच बेपत्ता होत असल्याने हे घडत असल्याची टीका होत आहे.

शिवाजीनगर न्यायालयात वकिली करणारे उमेश मोरे एक ऑक्टोबरपासून बेपत्ता होते. त्यांचे अपहरण करून खून केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी त्यांच्या कुटुंबीयांनी दोन ऑक्टोबरला 'मिसिंग'ची तक्रार दाखल केली होती. पण, पाच दिवस पोलिसांनी विशेष लक्ष दिले नाही. कुटुंबीयांनी घातपाताचा संशय व्यक्त केल्यानंतर अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर तपासाची सूत्रे फिरून आरोपीला अटक करण्यात यश आले.

पण, यापूर्वीदेखील 'मिसिंग'च्या तक्रारींकडे पोलिसांनी गांभीर्याने न पाहिल्याने नंतर त्या घटनेतील व्यक्तीला प्राण गमवावा लागल्याची उदाहणे आहेत. जानेवारी २०१९मध्ये खडक परिसरातील एका व्यावसायिक बेपत्ता झाला होता. आरोपींनी त्या व्यावसायिकाचे स्वारगेट येथे अपहरण करून भारती विद्यापीठ परिसरात नेऊन त्यांचा खून केला, तसेच मृतदेह घाटात टाकून दिला होता. या प्रकरणी व्यावसायिकाच्या कुटुंबीयांनी 'मिसिंग'ची तक्रार दाखल केली. पण, पोलिसांनी त्याच्याकडे गांभीर्याने पाहिले नाही. काही दिवसानंतर व्यावसायिकाचा मृतदेह ग्रामीण पोलिसांना सापडल्यानंतर खडक पोलिसांना या प्रकरणाचे गांभीर्य समजले.

भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतदेखील जानेवारी महिन्यात 'मिसिंग'च्या प्रकरणात गांभीर्याने तपास केला नसल्याचा आरोप संबंधिताच्या नातेवाइकांनी केला होता. ३० जानेवारी रोजी विनायक शिरसाट ही व्यक्ती बेपत्ता झाली होती. त्यांच्या नातेवाइकांनी तत्काळ धाव घेऊन 'मिसिंग'ची तक्रार दिली. संघटनांचा दबाव आणल्यानंतर पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. शिरसाट यांचा खून झाल्याचे १३ फेब्रुवारीला आढळून आले. पोलिसांनी सुरुवातीलाच गांभीर्याने तपास केला असता, तर त्यांचा जीव वाचला असता, असा दावा नातेवाइकांनी केला होता.

बिबवेवाडीतून दीड वर्षांपासून बेपत्ता असलेल्या व्यक्तीचा खून झाल्याचे काही दिवसांपूर्वी समोर आले आहे. या प्रकरणी आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. या सर्व गोष्टी घडत असताना 'मिसिंग'कडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येत आहे.

### आहे यंत्रणा तरी...

'शहरात सीसीटीव्हीचे जाळे आहे. तसेच, पोलिसांकडे अनेक तांत्रिक गोष्टी असून, त्याद्वारे तत्काळ बेपत्ता व्यक्तीची माहिती काढणे शक्य आहे. मात्र, बेपत्ता व्यक्तीचा शोध घेण्यास कष्ट घ्यावे लागतात. त्या वेळी पोलिस कमी पडतात. सीसीटीव्ही पाहणे, सीडीआर काढणे अशा अनेक गोष्टींचा वापर पोलिस करू शकतात. पण, पोलिस ठाण्याच्या इतर कामांतून पोलिस बेपत्ता प्रकरणांकडे लक्ष देत नाहीत. पण, बेपत्ता झालेली व्यक्ती, तिची पार्श्वभूमी याची माहिती घेऊन गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे,' अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

### सर्वाधिक बेपत्ता महाराष्ट्रात

व्यक्ती बेपत्ता होण्यामध्ये देशात महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. २०१९अखेर राज्यातील ५७ हजार ४९७ नागरिक बेपत्ता आहेत. त्यानंतर पश्चिम बंगालमध्ये ५३ हजार ५३९ नागरिक बेपत्ता आहेत. देशात तीन लाख ४४ हजार ३९५ नागरिक बेपत्ता असल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्रात २०१८ अखेर ५८ हजार नागरिक बेपत्ता होते. २०१९मध्ये त्यात ६६ हजार ४७८ बेपत्ता नागरिकांची भर पडली. त्यामुळे एक लाख २४ हजार ५१५ नागरिक बेपत्ता झाले होते. त्यापैकी २०१९पर्यंत ६७ हजार नागरिकांचा शोध घेण्यात यश आले आहे. तरीही ५७ हजार नागरिक बेपत्ता असल्याचे 'एनसीआरबी'च्या अहवालात दिसून आले आहे.

---

## JSW HOLDINGS LIMITED

CIN: L67120MH2001PLC217751
Regd. Off.: Village: Vasind, Taluka: Shahapur, District: Thane - 421 604
Phone: 022-4286 1000 / 02527-220022 Fax: 022-4286 3000 / 02527-220020 Website: www.jsw.in

### NOTICE

**NOTICE** is hereby given that pursuant to Regulation 47 read with Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 a meeting of the Board of Directors of the Company will be held on Saturday, the 31st day of October, 2020, to inter alia, consider and take on record, amongst other business, the Unaudited Standalone and Consolidated Financial Results of the Company for the Second Quarter (Q2) and Half year ended 30th September, 2020.

Place: Mumbai
Date : October 21, 2020

For **JSW Holdings Limited**
Sd/-
Deepak Bhat
**Company Secretary**

JINDAL Part of O.P. Jindal Group

---

## NORTON ग्राईंडवेल नॉर्टन लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** लिला बिझनेस पार्क, ५वा स्तर, अंधेरी-कुर्ला रोड, मरोळ, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००५९. **दूर.:**०२२-४०२१२१२१, **फॅक्स:**०२२-४०२१२१०२.
**ई-मेल:**sharecmpt.GNO@saint-gobain.com, **वेबसाईट:**www.grindwellnorton.co.in
**सीआयएन:** एल२६५९३एमएच१९५०पीएलसी००८१६३

### सूचना

येथे सूचना देण्यात येत आहे की, ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही व अर्धवर्षाकरिता कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय अहवाल विचारात घेणे व मान्यता देणे याकरिता शुक्रवार, ३० ऑक्टोबर, २०२० रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची वित्तीय वर्ष २०२०-२१ ची चतुर्थ सभा होणार आहे.

मंडळ सभेची सूचना कंपनीच्या www.grindwellnorton.co.in आणि स्टॉक एक्सचेंजच्या www.bseindia.com व www.nseindia.com वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

**ग्राईंडवेल नॉर्टन लिमिटेडकरिता**
**के. विस्वेस्वरन**
**कंपनी सचिव**
**सदस्यत्व क्र.ए१६१२३**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक: २१ ऑक्टोबर, २०२०**

---

## श्री ओंकार को-ऑप.क्रेडिट सोसा.लि. मुंबई

**मुख्य कार्यालय** - यशोदा निवास १/६, पहिला माळा, बोरला, चिंचपाडा, गोवंडी, मुंबई-४०००८८. मोबाईल : ९८६७२५५४६९/९८९२००२९३३

### सोने तारण कर्ज थकबाकीदारांना नोटीस

खालील निर्देशित केलेल्या कर्जदारांना अंतिम सूचना देण्यात येते की, त्यांनी आपल्या थकीत कर्जाची व्याजासह पुर्ण रक्कम **दि. ०४.११.२०२०** पर्यंत भरावी व या तारखेपर्यंत कर्जाची पुर्ण परतफेड केली नाही तर त्यांनी तारण म्हणून आमच्याकडे ठेवलेले सोन्याचे दागिने त्या तारखेनंतर त्वरीत विकण्यात येतील. सदरहू दागिने विकून कर्जाची वसुली झाली नाही तर उर्वरित कर्जाकरीता कर्जदार यांच्या विरुध्द **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये** कायदेशिर कारवाई करुन वसूल केले जाईल. त्यासाठी होणाऱ्या खर्चास व परिणामास कर्जदार स्वत: जबाबदार राहतील. तसेच दागिन्यांची विक्री झाल्यानंतर त्यांनी कोणतीही हरकत घेतल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही. याची कर्जदारांनी नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जदाराचे नांव | शाखा | सव्याज येणे बाकी |
|---|---|---|---|---|
| १) | २१ | श्री. विजय अनंत सुर्वे | कोपरखैराणे | १७१२६१/- |
| २) | ७० | श्री. गुरुदत्त मोहन प्रभु | कोपरखैराणे | १६०७५८/- |
| ३) | ९३ | सौ. पुनम जितेंद्र सोनी | कोपरखैराणे | १६५६०६/- |
| ४) | ११४ | श्री. कजोडमल हरिनारायण जाट | कोपरखैराणे | ३७५६०/- |
| | | एकुण | | ५३५१८५/- |

**विशेष सूचना** : सोन्याचे दागिने लिलाव पध्दतीने विकावेत की, सुवर्णकार मार्फत विकावेत किंवा इतर पध्दतीने विकावेत या बाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार पतसंस्थेने राखून ठेवला आहे. तसेच सोने दागिन्याची विक्री स्थगित करणे/रद्द करणे/पुढे ढकलणे या संबंधिचे अधिकारही पतसंस्थेने राखून ठेवले आहेत.

**सही/ -**
**अध्यक्ष**
**श्री ओंकार को-ऑप.क्रेडिट सोसा.लि.**

**दिनांक : २२.१०.२०२०**

---

ARKA FINCAP

## Arka Fincap Limited

**(Formerly known as Kirloskar Capital Limited)**
**Regd. Office:** One World Center, 1202B, Tower 2B, Floor 12B, Jupiter Mills Compound, Senapati Bapat Marg Mumbai- 400013, India
**Tel:** +91 22 40471000 **CIN:** U65993MH2018PLC308329 **Website:** www.arkafincap.com **E-mail:** arkainfo@arkafincap.com

### EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE HALF YEAR ENDED 30 SEPTEMBER 2020

(₹ in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Half Year Ended | |
|---|---|---|---|
| | | 30 September 2020 Unaudited | 30 September 2019 Unaudited |
| 1 | Total Income from Operations | ₹ 3,959.40 | ₹ 1,911.98 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | ₹ 1,023.26 | ₹ 233.71 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | ₹ 1,023.26 | ₹ 233.71 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | ₹ 705.66 | ₹ 89.54 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | ₹ 705.66 | ₹ 89.54 |
| 6 | Equity Share Capital (Face value of ₹ 10/- each) | ₹ 56,054.09 | ₹ 52,650.00 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | Refer note (c) | |
| 8 | Earning per share (In ₹ ) (Not Annualised)<br>(a) Basic<br>(b) Diluted | <br>0.13<br>0.13 | <br>0.02<br>0.02 |

a. The above is an extract of detailed format of unaudited financial results for the half year ended 30 September 2020, prepared pursuant to Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular dated 5 July 2016. The full format of the unaudited financial results are available on the website of the Company at www.arkafincap.com and on the website of the BSE Ltd. at www.bseindia.com.

b. The financial results of the Company have been prepared in accordance the Indian Accounting Standard ("Ind AS") notified under section 133 of the Companies Act, 2013 ("the Act") read with the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 as amended from time to time. The Company has adopted Ind AS from 1 April 2020 with effective transition date of 1 April 2019. This transition has been carried out from the erstwhile Accounting Standard notified under the Act, read with relevant rules issued thereunder and guidelines issued by the Reserve Bank of India ("RBI") and generally accepted accounting principles in India (collectively referred to as "Previous GAAP"). Accordingly, the impact of transition has been recorded in the opening reserve as at 1 April 2019 and the corresponding figures presented in these results have been restated/ reclassified.

There is a possibility that these financial results for the current and previous periods may require adjustments due to changes in financial reporting requirements arising from new standards, modifications to the existing standards, guidelines issued by the Ministry of Corporate Affairs and the RBI or changes in the use of one or more optional exemptions from full retrospective applications of certain Ind AS permitted under Ind AS-101 which may arise upon finalisation of the financial statements as at and for the year ending 31 March 2021 prepared under Ind AS.

c. As permitted under circular no. CIR/IMD/DF1/69/2016 dated 10 August 2016 issued by the Securities and Exchange Board of India ("SEBI"), the Company has opted to avail exemption for submission of Ind AS compliant financial results and statement of assets and liabilities for the previous year ended 31 March 2020 and accordingly the same has not been disclosed above. Further, financial results for the half year ended 30 September 2019 have not been subjected to limited review/audit. However, the management has exercised necessary due diligence to ensure that the financial results for the half year ended 30 September 2019 provide a true and fair view of the Company's affairs.

d. The unaudited financial results of Arka Fincap Limited ("AFL" or "the Company") for the half year ended 30 September 2020 have been reviewed by the Audit Committee and approved by the Board at its meeting held on 21 October 2020. The unaudited financial results have been subjected to limited review by the Statutory Auditor of the Company.

**For and on behalf of the Board of Directors of**
**Arka Fincap Limited**
**(Formerly known as Kirloskar Capital Limited)**
**Sd/-**
**Vimal Bhandari**
Executive Vice Chairman and CEO
DIN: 00001318

Place: Mumbai
Date: 21 October 2020

**Disclosures in accordance with Regulation 52(4) of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations") for the half year ended 30 September 2020**

**(a) Credit Rating**

| Sr. No. | Nature of Instrument | Name of the Instrument | Name of Credit Rating Agency | Amount Rated (₹ in Lakhs) | Current Rating | Date of Rating |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Long term instrument | Bank Lines | CRISIL | 50,000 | CRISIL AA-/Stable | 18/12/2019 |
| 2 | Long term instrument | Non-convertible debentures | CRISIL | 12,500 | CRISIL AA-/Stable | 29/05/2020 |
| 3 | Long term instrument | Non-convertible debentures | CRISIL | 5,000 | CRISIL AA-/Stable | 25/06/2020 |
| 4 | Short term instrument | Commercial paper | CRISIL | 5,000 | CRISIL A1+ | 30/12/2019 |

There is no change in the Credit Rating during the period.

**(b) Asset Cover available:** As per the first proviso to Regulation 52(4) of Listing Regulations, the requirement of disclosing Asset Cover is not applicable to the Company being a Non-Banking Financial Company registered with the Reserve Bank of India.

**(c) Debt-Equity Ratio: 0.94 : 1**

**(d) Previous due date for the payment of interest / repayment of principal in respect of the Non-Convertible Debentures and whether the same has been paid or not during the half year ended 30 September 2020:**

| Nature of the Instrument | Listed/ Un-Listed | Scrip Code | Previous Due date for Interest Payment | Previous Due date for Principal Payment | Payment Status |
|---|---|---|---|---|---|
| NCD Series I | Listed | 959522 | 31/08/2020 | - | Paid on 31/08/2020 |
| NCD Series II | Listed | 959543 | 31/08/2020 | - | Paid on 31/08/2020 |
| NCD Series III | Listed | 959592 | 30/09/2020 | - | Paid on 30/09/2020 |
| NCD Series IV | Un-Listed | NA | - | - | - |
| NCD Series V | Un-Listed | NA | - | - | - |

**(e) Next due date for the payment of interest / principal in respect of Non-Convertible Debentures from 1 October 2020 to 31 March 2021:**

| Nature of the Instrument | Listed/ Un-Listed | Scrip Code | Next Due date for Interest Payment | Next Due date for Principal Payment |
|---|---|---|---|---|
| NCD Series I | Listed | 959522 | 30/11/2020 & 28/02/2021 | - |
| NCD Series II | Listed | 959543 | 30/11/2020 & 28/02/2021 | - |
| NCD Series III | Listed | 959592 | 31/12/2020 & 31/03/2021 | - |
| NCD Series IV | Un-Listed | NA | - | - |
| NCD Series V | Un-Listed | NA | - | - |

**(f) Debt Service Coverage Ratio:** Not Applicable
**(g) Interest Service Coverage Ratio:** Not Applicable
**(h) Outstanding redeemable preference shares:** Nil
**(i) Debenture Redemption Reserve:** Not required in respect of privately placed debentures in terms of Rule 18(7)(b)(ii) of Companies (Share Capital and Debenture) Rules, 2014.
**(j) Net Worth** as on 30 September 2020 is ₹ 57,765.57 Lakhs
**(k) Net Profit After Tax** for the half year ended on 30 September 2020 is ₹ 705.66 Lakhs
**(l) Earnings per share** as on 30 September 2020: Basic and Diluted ₹ 0.13

* Net worth = Equity Share Capital + Other Equity – Deferred Tax Assets – Intangible assets
* Debt = Debt Securities + Borrowings
* Equity = Equity Share Capital + Other Equity – Deferred Tax Assets – Intangible assets

Yours faithfully,
For **Arka Fincap Limited** *(formerly known as Kirloskar Capital Limited)*
**Sd/-**
**Amit Bondre**
Deputy Company Secretary
*(Membership No. A 26105)*
Date: 21 October 2020